


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : ३१९ वा    शुक्रवार दि १३ मार्च २०२६    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# ऐन युद्धात अमेरिकेला धक्का, टँकर विमान कोसळलं; ४ जणांचा मृत्यू, दोघांचा शोध सुरु....

**वृत्तसंस्था/मॉस्को**

बगदाद: मध्य पूर्वेत युद्ध सुरु असताना अमेरिकेच्या हवाई दलाला शुक्रवारी मोठा धक्का बसला आहे. पश्चिम इराकमध्ये अमेरिकेच्या सैन्याचं केसी-१३५ रिफ्युलिंग विमान कोसळलं आहे. या विमानात एकूण सहा जण होते. यातील चार जणांचा मृत्यू झाला आहे. अमेरिकन सैन्याच्या सेंट्रल कमांड म्हणजेच सेंटकॉमनंदेखील ४ जणांच्या मृत्यूच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. या संदर्भात सेंट्रल कमांडनं सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केली आहे. केसी-१३५ रिफ्युलिंग विमानातील सहापैकी चार कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. अन्य दोन जणांचा शोध सुरु असून बचाव अभियान हाती घेण्यात आलं आहे, अशी माहिती सेंट्रल कमांडनं दिली आहे. अपघातामागील कारणांचा शोध घेतला जात आहे. तपास अद्याप सुरु आहे, असं सेंट्रल कमांडकडून सांगण्यात आलं आहे. शत्रूच्या हल्ल्यात किंवा फ्रेंडली फायरमुळे विमान पडलेलं नाही, ही बाब सेंट्रल कमांडनं स्पष्ट केली आहे. याचा अर्थ प्राथमिक माहितीनुसार, या अपघाताचा कोणत्याही हल्ल्याशी संबंध नाही. केसी-१३५ विमान अमेरिकेच्या हवाई दलातील रिफ्युलिंग विमान आहे. याचा वापर आकाशात अन्य लढाऊ विमानांना इंधन पुरवण्यासाठी केला जातो. त्यामुळे या विमानाला टँकर विमानदेखील म्हणतात. दीर्घ टप्प्याच्या सैनिकी कारवायांमध्ये टँकर विमानांची भूमिका महत्त्वाची आहे. सैनिकी आणि लढाऊ विमानांना युद्धाच्या दरम्यान दीर्घ काळ उड्डाण करण्याची क्षमता टँकर विमानांमुळे प्राप्त होते. यामुळे लढाऊ विमान जमिनीवर न उतरता दीर्घकाळ हवेत राहून कारवाया करु शकतात. अधिक कालावधीच्या कारवायांमध्ये टँकर विमानं महत्त्वाची भूमिका बजावतात. मध्य आशियात युद्ध पेटल्यापासून अमेरिकेनं ४ विमानं गमावली आहेत. याआधी कुवेतमध्ये फ्रेंडली फायर दरम्यान म्हणजेच स्वत:कडून झालेल्या गोळीबारामुळे अमेरिकेची तीन एफ-१५ विमानं अपघातग्रस्त झाली. आता कोसळलेलं



केसी-१२५ गेल्या ६० वर्षांपासून अमेरिकी सैन्याच्या सेवेत आहे. यात प्रामुख्यानं तीन जण असतात. पायलट, को-पायलट आणि अन्य विमानांत इंधन भरण्यासाठी एक जण कार्यरत असतो. या विमानातून ३७ जणांसह उड्डाण करता येतं.

# रात्री झोप लागत नाही? मग अंथरूणात जाण्याआधी खा हे ७ मेलाटोनिन पदार्थ, लागेल गाढ व शांत झोप...

**वृत्तसंस्था/ पुणे**

**झोप न येणे किंवा वारंवार जाग येणे याचे एक मुख्य कारण शरीरातील मेलाटोनिन (झोपेचे हार्मोन) आणि सेरोटोनिन (मनाला शांत करणारे हार्मोन) यांची कमतरता हे असते. नॅशनल स्लीप फाऊंडेशन नुसार, आपण झोपण्यापूर्वी जे खातो त्याचा थेट परिणाम आपल्या झोपेच्या चक्रावर ( ) होतो. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसन वर प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनानुसार, विशिष्ट पदार्थांमधील अमिनो ॲसिड्स मेंदूला शांत करण्याचे आणि स्नायूंना शिथिल करण्याचे काम करतात. खालील ७ पदार्थ नैसर्गिकरित्या झोप आणण्यासाठी अत्यंत प्रभावी मानले जातात.**



बदाम हे मॅग्नेशियमचा उत्तम स्रोत आहेत. मेयो क्लिनिक नुसार,मॅग्नेशियम शरीरातील सूज कमी करते आणि कोर्टिसोल (स्ट्रेस हार्मोनची) पातळी कमी करण्यास मदत करते. यामुळे स्नायू रिलॅक्स होतात आणि मेंदूला शांत झोपेचे संकेत मिळतात. किवी हे झोपेसाठी सर्वोत्तम फळ मानले जाते. जर्नल ऑफ टर्किश स्लीप मेडिसिन च्या संशोधनानुसार, झोपण्यापूर्वी १ तास आधी २ किवी खाल्ल्याने झोप लागण्याचा वेग ४२% नी वाढतो. यात असलेले सेरोटोनिन झोपेचे चक्र नियमित करते. दूध आणि झोप यांचे जुने नाते आहे. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसन वर प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनानुसार, दुधात ट्रिप्टोफॅन ( ) नावाचे अमिनो ॲसिड असते, जे मेंदूत मेलाटोनिन तयार करण्यास मदत करते. रात्री कोमट दूध प्यायल्याने मनाला सुरक्षिततेची भावना मिळते, ज्यामुळे शांत झोप लागते. अक्रोड हे मेलाटोनिनच्या सर्वोत्तम नैसर्गिक स्रोतांपैकी एक आहेत. नॅशनल स्लीप फाऊंडेशन नुसार, अक्रोडमधील फॅटी ॲसिड्स शरीरात गेल्यावर मेलाटोनिनची पातळी वाढवतात, ज्यामुळे रात्री वारंवार जाग येण्याची समस्या कमी होते. जर्नल ऑफ टर्किश स्लीप मेडिसिन च्या संशोधनानुसार, कॅमोमाइल चहामध्ये अपिजेनिन ( ) नावाचे अँटी-ऑक्सिडंट असते. हे घटक मेंदूतील विशिष्ट रिसेप्टर्सना जखडून धरतात, ज्यामुळे चिंता कमी होते आणि नैसर्गिक गुंगी येते. झोपण्यापूर्वी हा चहा पिणे नॅचरल ट्रँक्विलायझर सारखे काम करते. फॅटी फिशमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स आणि व्हिटॅमिन डी मुबलक प्रमाणात असते. स्लीप फाउंडेशनच्या अधिकृत अहवालानुसार, या दोन घटकांच्या मिश्रणामुळे शरीरात सेरोटोनिनची निर्मिती वाढते, ज्यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारते. ओट्समध्ये नैसर्गिकरित्या मेलाटोनिन असते. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसन वर प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनानुसार, मेलाटोनिन कर्बोदकांचा ( ) असा स्रोत आहेत ज्यामुळे शरीरात इन्सुलिनची पातळी स्थिर राहते. यामुळे रक्तातील साखर वाढत नाही आणि झोपेत अडथळा येत नाही.

# एका स्थलांतराचं चिंतन...



इराण-अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील युद्ध पश्चिम आशियात सुरू असले, तरी त्यातून निर्माण झालेली आनुषंगिक संकटे गॅसटंचाईमुळे आपल्या स्वयंपाकघरात येऊन ठेपली आहेत. शेअर बाजारात दररोज होत असलेले भूकंप, बंदरांमधील जहाजांमध्ये कुलूपबंद झालेली आयात-निर्यात, तेलाच्या दरांमधील चढउतार आणि स्वयंपाक व औद्योगिक गॅसच्या तुटवड्याने ठिकठिकाणी दिसून येणाऱ्या रांगा-दरवाढ यांचे चटके आता सर्वसामान्यांना बसू लागले आहेत. एकीकडे तेलाचा ओघ आटू लागल्याने आयातीवर आलेला ताण आणि निर्यात रखडल्याने शेतीमाल-फळांसारख्या नाशवंत मालाचे संभाव्य नुकसान होण्याची भीती आहे. विशेषतः द्रवरूप नैसर्गिक वायूचा पुरवठा विस्कळित झाल्याने महाराष्ट्रापासून गुजरातपर्यंत अनेक उद्योगांचे उत्पादनचक्र थंडावत असल्याचे चित्र दिसते आहे. अशा एकाच वेळी मंदी व महागाईच्या दुहेरी कात्रीत सापडण्याची भीती साधार ठरू लागली आहे. रशियन तेलाचा पुरवठा सुरू राहणार असल्याने सध्या तरी भारत सुपात असला, तरी युद्ध लांबल्यास होणाऱ्या जागतिक परिणामांमुळे आपणही जात्यात येण्यास वेळ लागणार नाही, अशी परिस्थिती दिसते. करोना साथीनंतर सावरलेल्या जगाला युद्धज्वरामुळे पुन्हा फटके बसण्याची भीती उभी राहिली आहे. गेल्या काही काळात जगभरात विकासदर मंदावला असला, तरी भारतीय अर्थव्यवस्थेने या काळातही ब्रिटन आणि जपानसारख्या देशांना मागे टाकून मोठी भरारी घेतली होती. मात्र, या वेगाला इराण-अमेरिका आणि इस्रायल युद्धाची नजर लागली, असे म्हणावे लागेल. विशेषतः इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेलवाहू जहाजांची वाहतूक रोखल्याने तेलसंकट उभे राहिले आहे. याचा साहजिक परिणाम म्हणून कतारसारख्या देशाने गॅसचे उत्पादन थांबवले. भारतातील अनेक उद्योगांतील उत्पादनचक्र त्यामुळे थंडावते आहे. छत्रपती संभाजीनगरसारख्या भागातील अभियांत्रिकी कारखान्यांतील उत्पादनांपासून ते गुजरातमधील ङ्गसिरॅमिकफ उत्पादन थंडावले असून, हजारो कामगार बेरोजगार होण्याची भीती आहे. तज्ज्ञांच्या मते युद्ध सुरू झाल्यापासून जगभरातील तब्बल १८ कोटी बॅरल इंधनाचा पुरवठा बाधित झाला आहे. त्यामुळे कच्च्या तेलाच्या दरांनी शंभरी ओलांडली होती; अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ङ्गयुद्ध समाप्तीच्या दिशेनेफ असल्याचे विधान केल्याने तेलाच्या दरवाढीला काहीसा ब्रेक लागला असला, तरी कोणीही स्थैर्याची हमी देऊ शकत नाही. इंधनावर अवलंबून असलेला वाहन उद्योग, रंग उद्योग, टायर, प्लास्टिकसारख्या अनेक क्षेत्रांना फटके बसत आहेत. आखातातून होणारा खतांचाही पुरवठा थांबला आहे आणि केळी, द्राक्षे, कांद्यापासून कलिंगडापर्यंत शेतीमालाची निर्यात रखडल्याने बळीराजा दुहेरी चिंतेत आहे. या अस्थिर परिस्थितीचे फटके पर्यटनालाही बसत आहेत. तेजी-मंदीच्या लाटांवर स्वार होणाऱ्या जगातील शेअर बाजारांमध्ये या अस्थिरतेचे प्रतिबिंब न दिसते तरच नवल! मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक अडीच हजार अंकांनी घसरून नंतर सावरला, तर ङ्गनिफ्टीफ्तही सव्वाचारशे अंकांनी घट झाली. नागरिकांमधील चिंता आणि परिस्थितीचा फायदा घेणाऱ्या साठेबाजांना चाप लावण्यासाठी केंद्र सरकारने अत्यावश्यक वस्तू नियंत्रण कायदा (इस्मा) लागू केला असला, तरी अनेक शहरांमध्ये सिलिंडरसाठी लागलेल्या रांगा, या सर्वसामान्यांमधील घबराटीचेच निदर्शक म्हणाव्या लागतील. अशा स्थितीत उपाययोजनांची व्याप्ती वाढणे आवश्यक आहे; त्याप्रमाणेच ऊर्जेबाबत स्वयंपूर्णतेचे लक्ष्य मैलोगणती दूर असले, तरी त्या दिशेने वाटचालीसाठी ठोस कार्यक्रम हाती घेण्याची आणि धोरणात्मक स्वायत्तता राखून ऊर्जापुरवठ्यातील विविधीकरणाची जाणीव या निमित्ताने अधोरेखित होते. युद्धाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी ङ्गभारत शांतता आणि संवादाच्या बाजूने आहे,फ अशी देशाची भूमिका स्पष्ट केली; तसेच तणाव कमी करण्यावर भर देऊन या देशांतील भारतीय समुदायाच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली. मात्र, त्यातून युद्धविषयक सडेतोड भूमिकेची अपेक्षा पूर्ण न झाल्याने आणि संसदेत चर्चेची संधी न मिळाल्याने विरोधक आक्षेप घेणे साहजिक आहेत. इंधन तुटवडा आणि दरवाढीने जग होरपळत असून गरीब-विकसनशील देशांचे अर्थकारण मोडून पडत आहे. मात्र, ङ्गशांतता आणि सुरक्षिततेसाठी ही किंमत किरकोळ आहे,फ ही ट्रम्प महाशयांची दिव्यवाणी त्यांना जगाची किती चाड आहे, हेच दर्शवणारी आहे, एवढे मात्र खरे.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# रोहित पवार राहुल गांधींच्या भेटीला, अजित पवार अपघात प्रकरणात मोलाची मदत करण्याचा शब्द

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज दिल्लीत जावून काँग्रेस नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेतली. यावेळी रोहित पवार यांनी राहुल गांधी यांच्याकडे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या घटनेबाबत माहिती दिली. राहुल गांधींच्या भेटीनंतर त्यांच्यासोबत काय चर्चा झाली? याबाबत रोहित पवारांनी सविस्तर माहिती दिली. 'राहुल गांधी यांच्यासोबत अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत चर्चा केली. मी ऋखठ बद्दल सांगितलं, अजित पवार यांच्या अपघात प्रकरणात दुर्दैवाने ऋखठ घेतला जात नाही, त्यात ते थोडेसे आश्चर्यचकीत झाले. त्याचं कारण म्हणजे या देशामध्ये प्रत्येक व्यक्तीचा ऋखठ होणं हा हक्क आहे', असं रोहित पवार म्हणाले.महाराष्ट्रामध्ये एवढा मोठा नेता म्हणजेच अजित पवार यांचा ऋखठ घेतला जात नाही याचं राहुल गांधी यांचा आश्चर्य वाटलं. त्याचबरोबर सीबीआयकडे प्रस्ताव पाठवला आहे. पण तो पोहोचलाय का? पोहचला असेल तर तो स्वीकारला



का जात नाही? असा प्रश्न केल्यानंतर ते म्हणाले त्याबाबतीत आपल्याला पाठपुरावा करावा लागेल. तेलगू देसम पार्टी, तडठ आणि वी के सिंग यांचं आर्थिक आणि वैयक्तिगत जे नातं आहे, त्याबद्दलची माहिती त्यांना सांगितली. सगळ्या गोष्टी बघितल्यानंतर त्यांनी मला शब्द दिलाय की, काँग्रेस पक्षाकडून किंवा त्यांच्याकडून जी काही ताकद लागेल किंवा मदत लागेल ती पूर्णपणे आम्ही करु. त्यांनी मला पुढच्या दोन दिवसांत काय करु याबाबत एक शब्द दिला आहे. पण मी दोन दिवसांत तुम्हाला याबाबतची माहिती आपल्याला देईन. राहुल गांधी यांच्याकडून अतिशय महत्त्वाची मदत होईल, असं आम्हाला वाटतं. दोन दिवसांत ती काय गोष्ट होती आणि काय मदत झाली, याबाबत मी नक्की सांगेन', अशी माहिती रोहित पवार यांनी दिली.ऊक्तउअ च्या अंतर्गत जेव्हा अअखइ तपास करते तेव्हा कलम ११ आणि १२ च्या अंतर्गत तपास केला जातो. कलम ११ च्या अंतर्गत जो तपास होतो त्यामध्ये जे अधिकारी असतात ते त्याच विभागाचे असतात. त्यामुळे ते खूप खोलात जावून आणि पारदर्शकतेने तपास करतील, असं नाही. कलम १२ अंतर्गत आपल्याला एक वेगळी कम्युनिटी निर्माण करता येते. त्यामध्ये ङजझ म्हणजे देशाचे जे विरोधी पक्षनेता आहेत त्यांना विनंती करता येते की, त्याचं अध्यक्षपद घेता येतं. याबद्दल राहुल गांधी यांना माहिती दिली. त्याबद्दल सुद्धा आपल्याला खोलात जावून विषय समजून घ्यावा लागेल', असं रोहित पवार म्हणाले.राहुल गांधी यांच्याकडून मला एवढंच सांगण्यात आलं की, आता भारताला इंधनाची मोठी अडचण आलेली आहे. तो मुद्दा आम्ही कालच्या बैठकीत घेतला आहे. जर हाही मुद्दा त्या बैठकीत घेतला तर दोन्ही विषयांकडे लक्ष जाणार नाही. त्यामुळे आपल्याला टप्प्याटप्प्याने हा विषय घ्यावा लागेल. अजित पवार यांना न्याय देण्यासाठी काँग्रेस सुद्धा लढेल, असं राहुल गांधी यांनी सांगितलं', अशी माहिती रोहित पवार यांनी दिली.महाराष्ट्राकडून अजूनही प्रस्ताव सीबीआयकडे पाठवला गेलेला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शब्द दिला होता की, अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास सीबीआयने करावा, असा प्रस्ताव पाठवू. पण तो प्रस्ताव अजून पाठवलेला नाही. प्रस्ताव पाठवण्यासाठी अजित पवारांच्या प्रमुखांनी विनंती केली होती. तसेच दोन दिवसांपूर्वी स्मरणपत्र देखील पाठवलं आहे. स्मरणपत्र देऊन सुद्धा साधा तो प्रस्ताव दिल्लीला येत नसेल तर सत्तेत असणारी लोकं अजित पवारांना न्याय देण्यासाठी काय प्रमाणात ताकद दाखवत आहेत?', असा सवाल रोहित पवार यांनी केला.

## संकटावर बोलायला पेट्रोलियम मंत्री उठले ; संसदेत विरोधक पेटले

**नवी दिल्ली :** अनेक भागांत एलपीजी सिलिंडरची टंचाई आहे. या सगळ्यावर संसदेत आज वादळी चर्चा झाली. इंधन तुटवड्यावर बोलताना लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जगभरात गाजत असलेल्या एपस्टिन फाईल्सचा उल्लेख केला. यानंतर संसदेत एकच गदारोळ झाला.मध्य पूर्वेतील युद्ध, त्यामुळे निर्माण झालेला इंधन तुटवडा यावर भाषण करताना काँग्रेसचे खासदार, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एपस्टिन फाईल्सचा उल्लेख केला. पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांचं नाव एपस्टिन फाईल्समध्ये आल्याचा उल्लेख राहुल गांधी यांनी करताच संसदेत एकच गोंधळ झाला. यावेळी खासदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावरुन लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राहुल यांना सुनावलं. निश्चित करण्यात आलेल्या विषयावरच चर्चा करा, अशा शब्दांत बिर्ला यांनी राहुल यांना समज दिली.एलपीजीच्या तुटवड्यावर लोकसभेत पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी माहिती दिली. यावेळी विरोधी बाकांवरील खासदारांनी जोरदार घोषणा



दिल्या. 'बघा, बघा, एपस्टिनचा मित्र आला,' अशा घोषणा विरोधकांनी दिल्या. विरोधी पक्षातील खासदारांनी घोषणांनी सभागृह दणाणून सोडलं. विरोधकांच्या घोषणा सुरु असताना मंत्री पुरी यांनी एलपीजी तुटवड्याबद्दल सविस्तर माहिती दिली.भारताला होत असलेला खनिज तेलाचा पुरवठा सुरक्षित आहे. होर्मुझ सामुद्रधुनीमुळे २० टक्के तेल वाहतुकीला फटका बसला आहे. देशात सध्याच्या घडीला पुरेसा वायू साठा आहे. त्यामुळे गॅस सिलिंडरवरुन त्रस्त होण्याची गरज नाही,' अशा शब्दांत त्यांनी सभागृहाच्या माध्यमातून देशाला आश्वस्त केलं.

'आपल्याकडे पुरेशा प्रमाणात खनिज तेल आहे. डिझेल, पेट्रोल आणि गॅस सिलिंडरचा तुटवडा नाही. एलएनजी कार्गो जहाजं दररोज येत आहेत.

## राज्यपालांना विधेयकाची प्रत इंग्रजीत का हवी?

**मुंबई :** भाजपचे आमदार आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार गेल्या काही दिवसांपासून विधिमंडळाच्या काम काजावरून सरकारवर ताशेरे ओढताना दिसत आहेत. अधिवेशनाच्या काम काजादरम्यान, राज्यपालांना विधेयकाची प्रत इंग्रजीत का हवी, असा प्रश्न त्यांनी गुरुवारी केला. मात्र, खासगी विधेयक मांडताना संविधानानुसार त्याची प्रत इंग्रजीतच देण्याचा नियम असल्याचे स्पष्ट करताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी त्यांची मागणी फेटाळून लावली. खासगी विधेयकाची ही खडाजंगी गुरुवारी विधिमंडळाच्या कामकजात लक्ष्यवेधी ठरली.आई वडिलांची काळजी न करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये २० टक्के कपात करून ती रक्कम थेट आई-वडिलांच्या खात्यात जमा करण्यासंदर्भात सुधीर मुनगंटीवार यांनी खासगी विधेयक मांडले होते. मात्र, या विधेयकाचा इंग्रजी अनुवाद सादर न केल्यामुळे हे विधेयक कामकाजातून वगळण्याचा निर्णय घेतला होता. याला मुनगंटीवार यांनी आक्षेप घेतला. राज्यपालांना इंग्रजी प्रत सादर न केल्यामुळे ते कामकाजातून वगळले आहे.

## चक्क मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांच्या नावे बनवले बनावट आधारकार्ड

**छत्रपती संभाजीनगर :** रमाई घरकुल योजनेच्या नावाखाली छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत गेल्या अनेक वर्षांपासून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा सुरू असल्याचा आरोप माजी खासदार इम्तियाज जलील यांनी आज पत्रकार परिषदेत केला. या घोटाळ्याची भीषणता इतकी धक्कादायक आहे की, चक्क देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाने बनावट आधार कार्ड, रेशन कार्ड आणि कास्ट सर्टिफिकेट तयार करून योजनेचा पैसा लाटण्याचा आरोप जलील यांनी केला.

इम्तीयाज जलील यांनी पत्रकार परिषदेत सादर केलेल्या कागदपत्रांमुळे प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत. यात देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या नावाने चक्क 'महार' जातीचे दाखले काढण्यात आले आहेत. एवढेच नाही तर एकनाथ शिंदे यांच्या नावाने बनावट रेशन कार्ड बनवून त्यात त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची नावेही समाविष्ट करण्यात आली आहेत. याच नावांनी बनावट आधार कार्ड तयार करून घरकुल योजनेसाठी



अर्ज करण्यात आले आहेत, असा दावा जलील यांनी केला आहे.शहरातील काही नेते गेल्या अनेक वर्षांपासून गरिबांच्या हक्काचा पैसा लाटत असल्याचा गंभीर आरोप जलील यांनी केला. मंत्र्यांच्या दबावाखाली महापालिका आयुक्तांनी कोटींच्या फाईलवर स्वाक्षरी केली असून या घोटाळ्यात काही बड्या नेत्यांचा समावेश असल्याचा दावा करत जलील यांनी त्यांच्या फाईल्सची आकडेवारीच जाहीर केली आहे. या प्रकरणी विभागाच्या विभागप्रमुखावर सही करण्यासाठी दबाव टाकला जात असल्याची माहितीही त्यांनी दिली.प्रशासनातील अधिकारीच यात सामील असल्याने केवळ तक्रारी करून न्याय मिळणार नाही, त्यामुळे मी सर्व सबळ पुरावे घेऊन उच्च न्यायालयात जाणार असल्याचे जलील यांनी स्पष्ट केले.

## 'माझ्यावर दबाव नाही, पुढच्या आठवड्यात पत्रकार परिषद घेणार'

**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे पुत्र जय पवार यांनी आज अजित पवार यांच्यासोबत विमान अपघातात निधन झालेल्या पिंकी माळी हिच्या कुटुंबियांची भेट घेतली. यानंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. जय पवार यांची पत्रकार परिषद पुढे ढकलण्यात आली आहे. याबाबत त्यांनी महत्त्वाची माहिती दिली. 'मी पुढच्या आठवड्यात पत्रकार परिषद घेईन. त्या पत्रकार परिषदेत मला जी काही माहिती मिळाली आहे त्याबद्दल सर्व माहिती देईन', असं जय पवार यांनी सांगितलं. 'पिंकी माळी यांच्या आईशी आम्ही बोललो. मुलगा किंवा मुलीचं आपल्या आई-वडिलांशी जवळचं नातं असतं. मी सुद्धा एक मुलगा आहे. हे दु:ख सहजासहज मनातून जाणार नाही. आता आम्हीच कुटुंब म्हणून एकमेकाची काळजी घेणार. त्यामुळे आम्ही त्यांच्याशी बोललो. पिंकी माळी यांच्या आई आज घरी आल्या आहेत. पण त्यांची



तब्येत अजून बरी नाहीय. त्यामुळे मी एका डॉक्टरांशी बोललो आहे. त्यांना उद्या ज्यूपीटर हॉस्पिटलमध्ये शिफ्ट करतील. तशी त्यांची प्रकृतीची तपासणी केली जाईल आणि काळजी घेतली जाईल', अशी माहिती जय पवार यांनी दिली.तुमची सोमवारी पत्रकार परिषद होणार होती. पण ती तुम्ही पुढे ढकलली. तुमच्यावर दबाव आहे का? असा प्रश्न पत्रकारांनी जय पवार यांना विचारला. त्यावर त्यांनी, 'माझ्यावर कुणाचाच दबाव नाही. आज जसं मी पिंकी माळींच्या कुटुंबाला भेटायला आलो आहे. मलाही स्वत:ला अजून काही माहिती पाहिजे. कारण सगळ्यांच्या समोर येऊन नुसत्या काही गोष्टी बोलून फायदा नाही. खरी माहिती पाहिजे आणि सगळ्यांच्या समोर त्या आल्या पाहिजेत. त्यामुळे आम्ही विचारपूर्वक याबाबत निर्णय घेतला. आमच्यावर दबाव कुणाचाच नाही. आम्ही अजित दादांच्या विचारांचे आहोत. अजित दादांनी सुद्धा तसंच केलं असतं. पूर्ण माहिती घेऊन पत्रकार परिषद घेतली असती', अशी महत्त्वाची प्रतिक्रिया जय पवार यांनी दिली.'रोहित पवार यांच्याबद्दल मी काही बोलू शकत नाही. सगळ्यांचा अधिकार असतो. रोहित दादांच्या मनात जे आहे, ते शक्य तशी माहिती काढत आहेत. सर्वच कार्यकर्ते आणि नागरिकांना नेमकं काय झालं आहे याची माहिती पाहिजे आहे. मला माहिती आहे की, अजित दादा असते तर त्यांनी सगळ्याच तपास यंत्रणांवर विश्वास ठेवला असता, जसा त्यांनी आधीच्या काळात विश्वास ठेवला आहे. आता पुढे जेव्हा नवीन अहवाल येईल त्यातून आपल्याला जी माहिती मिळेल त्यातून आपण बघू', अशी प्रतिक्रिया जय पवार यांनी दिली.जोपर्यंत तपास यंत्रणा आपल्याला सगली कायदेशीर माहिती देत नाहीत तोपर्यंत मी या सगळ्याबद्दल काहीत बोलू शकत नाही.

कारण आपल्याला ब्लॅक बॉक्समध्ये काय झालंय ते माहिती पाहिजे. फ्लाईट डेटा रेकॉर्डमध्ये काय माहिती मिळाली ते माहिती पाहिजे. अजून काही वेगवेगळ्या गोष्टी आहेत ज्या समोर आलेल्या नाहीत. जेव्हा त्या समोर येतील आपल्या सगळ्यांना माहिती मिळेल. माझी पुढच्या आठवड्यात पत्रकार परिषद आहे त्यामध्ये मी माझे विचार मांडेन', अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रूममेट्सच्या मानसिक त्रासाला कंटाळून १९ वर्षीय तरुणीनं जीवन संपवलं; तिघींविरुद्ध गुन्हा दाखल




**पुणे :** रूममध्ये सोबत राहणाऱ्या मैत्रिणींकडून मिळणाऱ्या सततच्या धमक्या आणि मानसिक त्रासाला कंटाळून १९ वर्षीय तरुणीने राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवल्याची धक्कादायक घटना चंदननगर परिसरात घडली आहे. पायल राजगुरू असे या तरुणीचे नाव आहे. या प्रकरणी संबंधित तिघींविरुद्ध चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पायल ही चंदननगर परिसरातील महावीर सोसायटीमध्ये राहत होती. त्याच रूममध्ये तिच्यासोबत काही मुलीही वास्तव्याला होत्या. गेल्या काही दिवसांपासून या तरुणींमध्ये काही कारणास्तव वाद सुरू होते. आरोप आहे की, पायलसोबत राहणाऱ्या त्या मुली तिला सातत्याने मानसिक त्रास देत होत्या. तिची समाजात बदनामी करण्याच्या धमक्या दिल्या जात होत्या. एवढेच नव्हे, तर 'तुझ्या आई-वडिलांना मारून टाकू', अशा आशयाच्या धमक्या देऊन तिला भीतीखाली ठेवण्यात आले होते.मिळालेल्या धमक्या आणि सततच्या छळामुळे पायल प्रचंड मानसिक तणावात होती. कोणाकडे दाद मागावी आणि हा त्रास कसा थांबवावा, या विवंचनेत असतानाच तिने आयुष्य संपवण्याचा टोकाचा निर्णय घेतला. राहत्या खोलीत पंख्याला दोरी बांधून तिने गळफास घेतला. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर चंदननगर पोलिसांना तातडीने पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तिचे कलेवर शवविच्छेदनासाठी पाठवले.सुरुवातीला या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, तपासादरम्यान सबुरीला देण्यात येणाऱ्या धमक्या आणि त्रासाची माहिती समोर आल्यानंतर, पोलिसांनी संबंधित तिघींवर गुन्हा दाखल केला आहे. जीवन संपवण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली असून, या तरुणींमध्ये नक्की कोणत्या कारणावरून वाद होते, याचा तपास आता पोलीस करत आहेत.एका १९ वर्षीय तरुणीचा असा दुर्दैवी अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेने वसतिगृहात किंवा रूम शेअरिंगमध्ये राहणाऱ्या तरुणींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. पुढील तपास चंदननगर पोलीस करत आहेत.

---

## कारच्या धडकेत चिमुकल्याचा मृत्यू



**मुंबई :** मागील महिन्यात मालाडमधील हाउसिंग सोसायटीच्या पार्किंग क्षेत्रात बेदरकारपणे वाहन चालवून चार वर्षांच्या मुलाच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या रहिवाशाला जामीन देण्यास मुंबई सत्र न्यायालयाने स्पष्ट नकार दिला आहे. 'आरोपीला जामीन दिल्यास पोलिसांच्या तपासावर परिणाम होऊ शकतो. तो फरार होण्याची शक्यता नाकारता येत नाही,' असे कारण नोंदवत न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज नुकताच फेटाळला. दिंडोशी पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरनुसार, ७ फेब्रुवारी रोजी अनेक मुले पार्किंग क्षेत्रात खेळत असताना आरोपी रमेश जत्रारा याने त्याची इनोव्हा गाडी बेदरकार पद्धतीने बाहेर काढली. त्यावेळी चार वर्षांच्या मुलाला गाडीची धडक बसल्याने तो गंभीर जखमी होऊन नंतर त्याचा मृत्यू झाला. त्याला वैद्यकीय साह्य न देताच आरोपी निघून गेला आणि नंतर सोसायटीच्या रखवालदाराने तक्रार दाखल केली. लग्नाच्या वीस वर्षांनंतर घरात पाळणा हलल्याने आनंदी झालेल्या कुटुंबावर एका क्षणात दुःखाचा डोंगर कोसळला.सोसायटीच्या पार्किंग क्षेत्रात मुले खेळत असतात आणि आपण बेफिकीरपणे वाहन चालवल्यास एखाद्याच्या जीवावर बेतू शकते, याची आरोपीला पूर्ण जाणीव होती. तरी त्याने ते कृत्य केले. तसेच, पार्किंगवरून वाद असल्याने आरोपीने जाणीवपूर्वक हे कृत्य केले,' असा आरोप मृत मुलाच्या कुटुंबीयांनी केला आहे.आरोपीने मुलाचा मृत्यू होईल, अशी हेतुपुरस्सर कृती केली नाही. हा प्रकार दुर्दैवी अपघाताचा आहे. जत्रारानेच जखमी मुलाला रुग्णालयात नेले. केवळ पीडित कुटुंबाच्या दबावामुळे भारतीय न्याय संहितेचे कलम १०५ (खून नसलेला मनुष्यवध) हे कलम पोलिसांनी नंतर समाविष्ट केले,' असा युक्तिवाद आरोपीचे वकील अक्षय शेट्टी यांनी न्यायालयात केला. मात्र सरकारी पक्षाने विरोध केला.आरोपीच्या कृत्यामुळेच मुलाचा मृत्यू झाला.

## अपमानास्पद वागणुकीला कंटाळून सासऱ्याची आत्महत्या

**सोलापूर :** सुनेच्या त्रासाला कंटाळून सासऱ्याने आत्महत्या केली आहे. सून ही नेहमी सासऱ्याला धकमकावत होती, 'तुला घरातून हाकलून देईन', अशी धमकी ती नेहमी देत असायची. सततच्या अपमानाला कंटाळून वृद्ध सासऱ्याने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली आहे.सुनेच्या त्रासाला कंटाळून बार्शी येथे एका ७३ वर्षीय वृद्धाने आत्महत्या केल्याने हळहळ व्यक्त होत आहे. सुनेच्या जाचाला कंटाळून राहत्या घरात आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल मंगळवारी रोजी सकाळी उघडकीस आली आहे. सर्जेराव शंकर नायकुडे (वय ७३, रा उपळाई रोड, बार्शी, जि. सोलापूर) असं आत्महत्या केलेल्या वृद्ध सासऱ्याचं नाव आहे. मयत सर्जेराव शंकरराव नायकुडे यांचा मुलगा महेश नायकुडे यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.सर्जेराव नायकुडे हे बार्शीतील 'वसुंधरा' बंगल्यात राहत होते. फिर्यादी महेश नायकुडे यांचा भाऊ उमेश याची पत्नी सारिका नायकुडे ही गेल्या काही महिन्यांपासून नोव्हेंबर २०२५ पूर्वीपासून सर्जेराव नायकुडे यांना किरकोळ कारणावरून वारंवार अपमानित करत होती.

## ९ मिनिटांचा कॉल, मेडिकल विद्यार्थिनीने आयुष्य संपवलं, डॉक्टरला अटक



**हैदराबाद :** पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीने आयुष्याची अखेर केल्याप्रकरणी डॉक्टरला अटक करण्यात आली आहे. आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथील रहिवासी बट्टुला दीपिका हिने फेब्रुवारीत इंजेक्शनद्वारे औषधांचा ओव्हरडोस घेत स्वतःला संपवल्याचा आरोप आहे. डॉक्टर अमर सहस्र याच्यासोबत दीपिकाचे प्रेमसंबंध असल्याचा संशय फोन रेकॉर्ड तपासल्यानंतर पोलिसांना आला. त्यानंतर महिन्याभराने ही कारवाई करण्यात आली. विजयवाडा येथील सिद्धार्थ मेडिकल कॉलेजमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशनच्या शेवटच्या वर्षाची विद्यार्थिनी असलेली बट्टुला दीपिका ही अॅनेस्थेसियोलॉजीचा अभ्यास करत होती. विजयवाडा येथील सरकारी जनरल हॉस्पिटलमध्ये ती ड्युटी डॉक्टर म्हणून काम करत होती. ५ फेब्रुवारी रोजी तिने रुग्णालयाच्या खोलीतच स्वतःला संपवलं. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, तिने स्वतःला एक प्राणघातक डोस इंजेक्शनने दिला होता.रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना ती आपल्या खोलीत मृतावस्थेत आढळली. तिच्या अकस्मात मृत्यूमुळे सहकारी विद्यार्थी आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. या घटनेनंतर दीपिकाच्या पालकांनी तक्रार दाखल करत तिच्या मृत्यूच्या कारणांची सविस्तर चौकशी करण्याची मागणी केली.तपासादरम्यान माचवरम पोलिसांनी दीपिकाच्या मोबाईलचा फोन डेटा आणि व्हॉट्सअॅप मेसेजचा अभ्यास केला. तिने मृत्यूच्या काही काळापूर्वी अलुगुपल्ली अमर सहस्र नावाच्या डॉक्टरशी बोलल्याचे समोर आले. पोलिसांनी सांगितले की ४ फेब्रुवारी रोजी रात्री १२.३० च्या सुमारास झालेला हा कॉल सुमारे नऊ मिनिटे चालला. या दोघांनी यापूर्वी अनेक वेळा संवाद साधला होता. शेवटच्या कॉलवर झालेलं बोलणं आणि दोघांमधील नातेसंबंधांतून दीपिकाने टोकाचं पाऊल उचललं असावं, असा अंदाज आहे.

---

# पाणी का वाया घालवतोस ?' विचारणं महागात; सुरक्षारक्षकाला संपवलं



**डोंबिवली :** सध्याच्या धकाधकीच्या जीवनात माणसाचा संयम किती सुटत चालला आहे, याची प्रचिती देणारी एक धक्कादायक घटना डोंबिवलीत घडली आहे. नळ चालू ठेवून पाणी वाया का घालवतोस, असा जाब विचारल्याच्या कारणावरून एका तरुणाने सुरक्षारक्षकाची धारदार शस्त्राने वार करून निघृण हत्या केली. या घटनेमुळे डोंबिवली पश्चिमेतील कोपर परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवली पश्चिमेतील कोपर परिसरातील अण्णाभाऊ साठेनगर येथे ही रक्ताळलेली घटना घडली. उमेश वाघ (वय ३५) हे परिसरात सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होते. बुधवारी परिसरात नळ चालू असल्याने पाणी वाया जात होते. हे पाहून उमेश वाघ यांनी तेथील तरुण अक्षय जाधव (वय ३०) याला नळ चालू ठेवण्याबाबत विचारणा केली आणि पाणी वाया घालवू नकोस असे बजावले. मात्र, हा साधा संवाद अक्षयला इतका जिव्हारी लागला की दोघांमध्ये शाब्दिक चकमक सुरू झाली.वादाचे रूपांतर काही वेळातच हाणामारीत झाले.

रागाच्या भरात अक्षयने जवळ असलेल्या धारदार शस्त्राने उमेश वाघ यांच्यावर सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात उमेश गंभीर जखमी झाले आणि रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. एका क्षुल्लक कारणावरून एका कष्टाळू व्यक्तीचा जीव गेल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.घटनेची माहिती मिळताच विष्णूनगर पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी वेगाने तपास चक्रे फिरवत आरोपी अक्षय जाधव याला काही तासांतच ताब्यात घेतले. अक्षयवर खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.

आज दुपारी आरोपीला कल्याण न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याची गुन्ह्याची गांभीर्य लक्षात घेऊन १६ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहेनळाचे पाणी वाहून जाण्यासारख्या अत्यंत किरकोळ गोष्टीवरून एका तरुणाने हत्या करण्यापर्यंत टोकाचे पाऊल उचलल्याने समाजमनातून संताप व्यक्त होत आहे. विष्णूनगर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# सूर्याला मागावी लागली होती अक्षर पटेलची माफी; बापू कॅप्टनवर रागवण्याचे कारण काय?

**मुंबई :** भारतीय संघाने टी-२० विश्वचषक जिंकला आणि अहमदाबादाच्या मैदानावर इतिहास रचला. भारतीय संघाची कामगिरी संपूर्ण विश्वचषकात चांगली राहिलेली पाहायला मिळाली. स्पर्धेत फक्त भारतीय संघाने एकच सामना गमावला आणि तो म्हणजे दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा. या सामन्यानंतर कर्णधार सूर्याकुमार यादव ड्रैसिंग रुममध्ये जाऊन एका खेळाडूची माफी मागावी लागली होती.२०२६ च्या आयसीसी टी२० विश्वचषक दरम्यान, टीम इंडियाचा शक्तिशाली फिरकी गोलंदाज अष्टपैलू आणि उपकर्णधार अुरी झरींशश्र काही सामन्यांसाठी प्लेइंग इलेव्हनमधून वगळण्यात आले. नेदरलँड्स आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या संघात अक्षरची जागा वॉशिंग्टन सुंदरने घेतली. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध संघाचा पराभव होताच, अक्षरला पुन्हा संघात घेण्यात आले. कर्णधार सूर्यकुमार यादवने आपली चूक मान्य केली आणि अक्षर पटेलची माफी मागितली.द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सूर्यकुमार यादव म्हणाला,



'त्याला वगळण्यात आले तेव्हा तो खूप रागावला होता आणि तो असायला हवा होता. तो एक अनुभवी खेळाडू आहे आणि एका फ्रँचायझीचे नेतृत्व करतो. त्याला राग येणे स्वाभाविक होते. मी माफी मागितली आणि म्हणालो, 'मी चूक केली, कृपया मला माफ करा. मला त्याचा पश्चात्ताप आहे, पण तो संघाचा निर्णय होता.' ही एक कठीण चर्चा होती. त्याने ते हलके घेतले आणि आम्ही दुसऱ्या दिवसापर्यंत त्यावर चर्चा केली.'अक्षर पटेल उत्कृष्ट फॉर्ममध्ये होता, पण सुपर ८ साठी पात्र झाल्यानंतर, संघाने अक्षर पटेलला वगळले आणि सुंदरला स्थान दिले. नेदरलँड्सविरुद्ध, सुंदरने एकही विकेट घेतली नाही आणि फलंदाजी केली नाही. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध, त्याने दोन षटकांत १७ धावा दिल्या आणि फक्त ११ धावा केल्या. त्यानंतर, अक्षरला संघात परत आणण्यात आले आणि पुन्हा त्याला वगळण्यात आले नाही. अक्षर पटेलला २०२६ च्या टी२० विश्वचषकात फलंदाजीच्या फारशा संधी मिळाल्या नाहीत. त्याने आठ सामन्यांमध्ये चार डावांमध्ये फक्त १६ धावा केल्या, परंतु त्याची गोलंदाजी प्रभावी होती, त्याने ११ विकेट घेतल्या. न्यूझीलंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात, त्याने २७ धावांत तीन विकेट घेतल्या, ज्यामुळे भारताला आरामदायी विजय मिळवून देण्यात मदत झाली. अक्षर पटेलने आतापर्यंत भारतासाठी ७१ टी२० सामने खेळले आहेत, ज्यामध्ये ८५८ धावा केल्या आहेत आणि ९७ विकेट घेतल्या आहेत.

## दोन मालिका खेळणार भारतीय संघ; ३० खेळाडूंची निवड करण्यासाठी सज्ज

**मुंबई :** नुकताच टी-२० विश्वचषक २०२६पार पडला. जो भारतीय संघाने जिंकला. भारतीय संघाने विश्वचषक जिंकून इतिहास रचला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी मैदानावर न्यूझीलंडच्या संघाला ९६ धावांनी मात दिली. आता त्यानंतर खेळाडू आयपीएल खेळण्यासाठी सज्ज झाले आहेत. २८ मार्च २०२६ पासून या स्पर्धेला सुरुवात होईल. यानंतर भारतीय संघ एकाच वेळी दोन स्पर्धा खेळण्याची शक्यता आहे. या स्पर्धा कोणत्या आहेतबीसीसीआय लवकरच एकाच वेळी दोन भारतीय संघ खेळवू शकते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, भारतीय क्रिकेट संघ ऑक्टोबरमध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेव्यतिरिक्त आशियाई स्पर्धेत भाग घेऊ शकतो. अहवालांनुसार वेस्ट इंडिज मालिका ऑक्टोबरपर्यंत वाढू शकते आणि या काळात आशियाई खेळ जपानमध्ये होतील, जिथे भारताचा टी-२० संघही सहभागी होईल. गेल्या आशियाई खेळांमध्ये भारताने सुवर्णपदक जिंकले होते.क्रिकबझच्या अहवालानुसार बीसीसीआय ३० भारतीय खेळाडूंची निवड



करेल. यापैकी १५ जण आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदकासाठी प्रयत्न करतील, तर उर्वरित १५ जण वेस्ट इंडिजविरुद्ध एकदिवसीय मालिका खेळतील. टीम इंडियाने यापूर्वी एकाच वेळी दोन मालिका खेळल्या आहेत. २०२१ मध्ये, विराट कोहलीच्या नेतृत्वाखालील एका भारतीय संघाने इंग्लंडमध्ये डब्ल्यूटीसी फायनल आणि नंतर पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळली, तर शिखर धवनच्या नेतृत्वाखालील दुसऱ्या संघाने श्रीलंकेत एकदिवसीय आणि टी-२० मालिका खेळली. भारतात प्रतिभावान खेळाडूंची कमी नाही आणि बीसीसीआयला खेळाडू निवडण्यात कोणतीही अडचण येणार नाही हे स्पष्ट आहे.२०२६ चे आशियाई क्रीडा स्पर्धा १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान जपानमध्ये होणार आहेत.

## हार्दिक पांड्या गोत्यात, गर्लफ्रेंडसोबतचे चाळे महागात, पुण्यात स्टेशनमध्ये तक्रार दाखल

**पुणे :** भारतीय संघाचा स्टार खेळाडू हार्दिक पांड्या अडचणीत येण्याची शक्यता आहे. वर्ल्ड कप जिंकल्यावर अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये सर्व खेळाडू जल्लोष करत होते. यादरम्यान हार्दिक पांड्या त्याची गर्लफ्रेंड माहिका शर्मा हिच्यासह दिसला होता.दोघेही मैदानात फिरत होते, एकमेकांना किसही केले. पण त्यानंतर दोघे स्टेजवर गेले आणि झोपले याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यावेळी पंड्याच्या गळ्यात आपल्या देशाच्या तिरंगा झेंडा होता. त्यामुळे पंड्याकडून तिरंग्याचा अपमान झाल्याचा आरोप करत पुण्यातील वकील वाजेद खान यांनी पोलीस ठाण्यात तक्रारीचा अर्ज दाखल केला आहे.भारताने आयसीसी वर्ल्ड कप जिंकल्यानंतर मैदानावर सेलिब्रेशन झाले. त्यादरम्यान भारतीय तिरंग्याचा अवमान केल्याचा आरोप करत पुण्यातील वडगाव शेरी येथील ॲडव्होकेट वाजेद खान यांनी हार्दिक पांड्या यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे दिलेल्या अर्जामध्ये राष्ट्रीय



गौरव अवमान प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाईची मागणी करण्यात आली आहे. सेलिब्रेशनदरम्यान हार्दिक पांड्या यांनी भारतीय तिरंगा अंगावर घेत मैदानाच्या कोपऱ्यात झोपल्याचा आरोप करण्यात आला आहे. या वेळी भारतीय ध्वज गुंडाळलेल्या अवस्थेत असल्याचे काही फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याचेही अर्जात नमूद करण्यात आले आहे. पुण्यासह बंगळुरूमध्येही एक सामाजिक कार्यकर्त्याने पोलीस स्थानकात तक्रार दाखल केल्याची माहिती समजत आहे.भारतीय राष्ट्रीय ध्वजाचा सन्मान राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून संबंधित कृतीमुळे तिरंग्याचा अवमान झाल्याचा आरोप अर्जदाराने केला आहे. त्यामुळे राष्ट्रीय गौरव अवमान प्रतिबंधक अधिनियम १९७१ अंतर्गत गुन्हा दाखल करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. दरम्यान, या तक्रारीसोबत संबंधित फोटो व व्हिडिओ पुरावेही जोडण्यात आल्याचे अर्जदाराने सांगितले आहे.

## अर्शदीप सिंगने माफी नसती मागितली तरी चाललं असतं : गौतम गंभीर

**मुंबई :** यंदा टी२० वर्ल्ड कप फायनल सामना भारत आणि न्यूझीलंडमध्ये पार पडला होता. यामध्ये भारतीय शिलेदारांनी किवींचा ९६ धावांनी पराभव करत इतिहास रचला. भारताने एकूण तिसऱ्यांदा विजेतेपद नावावर केले असून घरच्या मैदानावर वर्ल्ड कप जिंकणारा पहिलाच देश ठरला आहे. या सामन्यामध्ये भारताचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग आणि न्यूझीलंडचा स्टार खेळाडू डेरिल मिचेल यांच्यात चालू सामन्यामध्ये खटका उडाला होता. या वादानंतर अर्शदीप याने मिचेलची माफीसुद्धा मागितली होती. मात्र कोच गौतम गंभीरने अर्शदीपला माफी मागण्याची गरज नव्हती असं म्हटलं आहे. जेव्हा कोणताही खेळाडू आपल्या




देशासाठी खेळतो. त्यावेळी तो आक्रमक किंवा जोशमध्ये असणं स्वाभाविकच आहे. कारण जर वेगवान गोलंदाजाला दोन षटकार बसतात तेव्हा तो त्याची रिॲक्शन येणं सामान्य गोष्ट आहे. अर्शदीपने जरी माफी मागितली नसती तरीसुद्धा मला काही अडचण नव्हती. मैदानात उतरल्यावर प्रत्येक खेळाडू आपल्या देशाला जिंकण्यासाठी उतरतो, यआधीसुद्धा क्रिकेटमध्ये असे वाद होतच होते.


पण आता सोशल मीडियामुळे लहान गोष्टींनाही मोठा मुद्दा बनवलं जातं, असं गौतम गंभीरने म्हटलं आहे.या वादामुळे आयसीसीने अर्शदीप सिंगच्या मॅच फी मधून १५ टक्के कपात केली होती. अर्शदीपला त्याला काही नुकसान पोहोचवायचं नव्हतं. पण त्याने चेंडू फ`कल्यानंतर मिचेल त्याच्यावर थेट धावला. अर्शदीप माघारी जात असताना त्याच्या दिशेने जात होता. त्यावेळी तो काही बोलला नाही, कॅप्टन सूर्यकुमार यादवने मध्यस्थी केली.दरम्यान, वर्ल्ड कप फायनलची ११ वी ओव्हर अर्शदीप सिंग टाकत होता. त्यावेळी किवींचा अर्धा संघ आऊट झाला होता. सामना जवळपास भारताने आपल्या हातात ओढला होता. डेरिल मिचेल मोठे फटके मारण्याचा प्रयत्न करत होता. त्यावेळी पाचवा बॉल निर्धाव गेला तेव्हा चेंडू अर्शदीपच्या हातात गेला. यादरम्यान मिचेल क्रीजच्या बाहेर आला होता, तेव्हा अर्शदीपने चेंडू थ्रो केला पण तो मिचेलला लागला. तेव्हा दोघांमध्ये राडा झालेला पाहायला मिळाला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तिचं आयुष्य सोपं नव्हतं, ती बळी पडली' ; मुस्लीम बॉयफ्रेंडसोबत मोनालिसाच्या लग्नानंतर दिग्दर्शकाची पोस्ट

**मुंबई :** 'महाकुंभ व्हायरल गर्ल' म्हणून ओळखली जाणारी मोनालिसा पुन्हा एकदा ट्रेंडिंगमध्ये आहे. यावेळी ती तिच्या चित्रपटामुळे नाही तर तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. काल मोनालिसानं मुस्लिम बॉयफ्रेंडसोबत लग्न केलं. त्यांच्या लग्नाचे फोटो आणि व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अशातच आता ज्या दिग्दर्शकाने मोनालिसाला इंडस्ट्रीमध्ये आणलं, त्यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. इन्स्टाग्रामवर सानोज मिश्रा यांनी पोस्ट करत लिहिलं की, 'ही बंडखोरी नाहीये, हे लव्ह जिहाद आहे... आणि माझ्या आयुष्यातील सर्वात वाईट दिवस आहे.'मोनालिसा आज पुन्हा चर्चेत आली आहे आणि मला वाईट वाटतंय कारण, ती एक गरीब, जंगलात राहणारी मुलगी होती जी महाकुंभमेळ्यात व्हायरल झाल्यानंतर महेश्वर येथून पळून गेली होती. तिच्यात गंगासारखी पवित्रता आणि तिचा स्वभाव बघून मी इम्प्रेस झालो. मी तिला प्रशिक्षण देण्याची आणि तिला चित्रपट अभिनेत्री





बनवण्याची घोषणा केली. परंतु आमचे विरोधक, वसीम रिझवी आणि त्यांचे समर्थक यांना हे आवडलं नाही आणि त्यांनी मला खोट्या आरोपांवर तुरुंगात पाठवलं. मी तुरुंगात असताना कथा लिहिली आणि चित्रपट पूर्ण केल्यानंतर, सनोज कधीही चित्रपट बनवणार नाही असं म्हणणाऱ्यांना मी तोंडावर पाडलं. चित्रपट पूर्ण केल्यानंतर, मी त्यांचा इतका अपमान केला की, त्यांना कोणताही आरोप समजला नाही आणि पुढे काय करावं हे समजू शकलं नाही.'सनोज यांनी पुढे लिहिलं की, 'मोनालिसाचं आयुष्य तुम्ही सर्वजण कल्पना करता तितकं सोपे नाही. तिची आई, मोठी आई, धाकटी आई, वडील, मोठे वडील आणि धाकटे वडील हे सर्व फक्त दिखाव्यासाठी होते. जेव्हा ती मोठी सेलिब्रिटी झाली आणि तिच्या खऱ्या आईला हार विकताना पाहिलं तेव्हा ती रडायची. ती अनेकदा माझ्याकडे हे दुःख व्यक्त करायची. 'जर मला कधी संधी मिळाली तर मी सर्वांना बाहेर काढेन आणि माझ्या आईकडे जाईन'असं ती म्हणायची. मी नेहमीच तिला समजावून सांगितलं, परंतु अशा वैयक्तिक बाबींमध्ये हस्तक्षेप करणं योग्य नव्हतं.'मोनालिसा लव्ह जिहादला बळी पडली आहे. तो मोनालिसाचा मॅनेजर होता. आज तो बेरोजगार आहे. मी त्याला मोनालिसाला शिक्षण देण्यासाठी ठेवलेलं, परंतु नंतर तो दलाल बनला आणि दक्षिण भारतात तिच्याशी व्यवहार करू लागला. त्यानं मला बंजारा समुदायापासून दूर केलं. पैशांसाठी मोनालिसा लव्ह जिहादची बळी पडली. मी माझं संपूर्ण आयुष्य मोनालिसाला समर्पित केलं. मी आजपर्यंतचा तिचा सर्व खर्च उचलला आणि तिच्यामुळे मी तुरुंगात गेलो.' असं सनोज यांनी शेवटी म्हटलं आहे.

## ना कंगना, ना कियारा ; 'सैय्यारा' फेम अभिनेत्री अनीत पड्डा मोठ्या पडद्यावर साकारणार मधुबाला ?


**मुंबई :** मधुबाला म्हटलं, की एक अलौकिक सौंदर्य अनब अदाकारी समोर येते. हिंदी मनोरंजनसृष्टीसाठी हे नाव एखाद्या गूढरम्य कथेसारखं राहिलं आहे. आज इतक्या वर्षांनंतरही या नावाची चर्चा होणं, ही गोष्ट दिवंगत अभिनेत्री मधुबाला यांच्या लोकप्रियतेची प्रचिती देणारी आहे. याच कारणास्तव गेली अनेक वर्षं मधुबाला यांच्या चरित्रपटाची चर्चा रंगली. त्यांच्यावर सिनेमा झालाच, तर त्यात कुणी काम करावं, याबद्दल अनेकांनी अनेक प्रकारची मतं व्यक्त केली.अगदी माधुरी दीक्षितपासून करिना कपूर, कंगना रणौतआणि अलीकडे कियारा अडवाणी यांच्या नावाची चर्चा झाली. आता इंडस्ट्रीतल्या ताज्या चर्चेनुसार, 'सैय्यारा' फेम अभिनेत्री अनीत पड्डा हिला मोठ्या पडद्यावर मधुबाला साकारण्याची संधी मिळणार आहे, असं कळतंय. एकीकडे ती या सिनेमात मुख्य भूमिकेत नाही असंही बोललं जात आहे. याआधी कियारा अडवाणीचं नाव चर्चेत होतं. मित्र, कियारा मीनाकुमारी यांच्यावरील चरित्रपट करत असल्याचं पक्कं झाल्यानं ती या चर्चेच्या पर्यायांतून बाहेर पडली आहे.या चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेत मधुबाला यांची बहीण मधुर बृज भूषण यांचाही सहभाग असल्याचं कळतंय, तर दिग्दर्शन जसमीत के. रीन करणार आहे. सिनेमाच्या पोस्टरची वा फर्स्ट लूकची प्रेक्षक वाट पाहत असताना अद्याप कोण अभिनेत्री यात मुख्य भूमिकेत आहे, हे स्पष्ट झालेलं नाही. तोपर्यंत या विषयाची



चर्चा होतच राहणार, असं दिसतंय.मिळालेल्या माहितीनुसार या चित्रपटाचं दिग्दर्शन जस्मित के. रिन करणार आहेत. जस्मित यांनी यापूर्वी आलिया भट्ट अभिनीत 'डार्लिंग्स' या चित्रपटाचं यशस्वी दिग्दर्शन केलं आहे. मधुर बृज भूषण या स्वतः या चित्रपटाच्या सह-निर्मात्या आहेत, ज्यामुळं हा चित्रपट अधिक वास्तववादी असेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.दरम्यान, मधुबाला यांचं आयुष्य एका परीकथेसारखं वाटलं तरी त्यात अनेक दुःखद वळणं होती. त्यांच्या बहिणीच्या पाठिंब्यामुळं आम्ही त्यांच्या आयुष्यातील काही अनोखे पैलू प्रेक्षकांसमोर आणणार आहोत, असं निर्मात्यांनी म्हटलं आहे.

## शमिता शेट्टीलाही महाराष्ट्राच्या हास्यजत्रेची भुरळ ; प्रहसनावर बनवलं रील

**मुंबई :** महाराष्ट्राची हास्यजत्रा हा लोकप्रिय कार्यक्रम असून हा कार्यक्रमाचा चाहतावर्गही खूप मोठा आहे. सामान्य प्रेक्षकांपासून ते कलाकारांपर्यंत हास्यजत्रेचे चाहते आहेत. या कार्यक्रमानं अनेक नवोदित कलाकारांना ओळख दिली. पृथ्वीक प्रताप, नम्रता संभेराव, वनिता खरात, निखिल बने, प्रियदर्शिनी इंदलकर, शिवाली परब, यांसारखे कलाकार हास्यजत्रेमुळे घराघरात पोहोचले आणि लोकप्रिय झाले. या कलाकारांचाही मोठा चाहतावर्ग आहे. अशातच आता बॉलिवूड अभिनेत्री शमिता शेट्टीलाही 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'ची भुरळ पडली आहे. अभिनेत्रीनं हास्यजत्रेच्या प्रहसनावर एक रील शेअर केली आहे. शमितानं पृथ्वीक प्रतापच्या स्कीटवर रील बनवली आहे. उत्तम लिप्सिंग करत शमितानं अभिनय केला आहे. या व्हिडिओवर पृथ्वीक प्रतापने कमेंट करत, 'थँक यू शमिता जी' अशी कमेंट केली आहे. मराठी भाषेत अभिनेत्रीचं रील पाहून चाहत्यांना धक्का बसलाय. शमिताच्या या रीलवर



चाहत्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एका युजरने कमेंट करत लिहिलं की, व्वा, तू मराठीत रील बनवलं हे आश्चर्यकारक आहे. छान. आणखी काही रील बनवण्याचा प्रयत्न कर. शुभेच्छा तर दुसऱ्या युजरने लिहिलं की, वाह शमिता वाह... जमलं तुला'त्याचबरोबर इतर नेटकऱ्यांनी, परफेक्ट जमलं, छान शमिता मस्त मराठीत लिप्सिंग केलीस.., जमलं बर का', 'Queen of hearts' अशा कमेंट्स करत शमिताचं कौतुक केलं आहे.दरम्यान, शमिता शेट्टीच्या कामाबद्दल सांगायचं तर, तिनं 'मोहोब्बते', 'कॅश', 'साथिया', 'बेवफा', 'मोहोब्बत हो गयी है तुमसे', 'मेरी सासू मा' यांसारख्या मालिका आणि सिनेमांमध्ये काम केलं आहे.

# रितेश देशमुख आणि बिग बॉस मराठीबद्दल बोलाल तर मी खपवून घेणार नाही', जान्हवी किल्लेकरची रुचिता जामदारवर टीका

**मुंबई :** बिग बॉस मराठीचा सहावा सीझन चांगलाच चर्चेत आहे. या सीझनमध्ये सगळ्यात चर्चेत असलेली रुचिता जामकर ही नुकतीच घराबाहेर पडली. घराबाहेर आल्यानंतर तिनंअप्रत्यक्षपणे आपल्यासोबत भेदभाव करण्यात आल्याचं म्हटलं. होस्ट रितेश देखमुखने देखील मला स्वत:ची बाजू मांडायची कधीच संधी दिली नाही, असं तिनं म्हटलं . या सगळ्यानंतर बिग बॉस मराठीच्या पाचव्या सीझनमधील स्पर्धक जान्हवी किल्लेकर हिनं रुचिताला सुनावलं आहे. ज्या शोमुळे तुम्ही घराघरांत पोहोचला, त्याचा शोच्या विरोधात बोलू नका, अस तिनं म्हटलं. हाय,हॅलो, नमस्कार. आज मला तुम्हाला



सगळ्यांना एक प्रश्न विचारायचा आहे. आज आपल्या महाराष्ट्रात असेन अनेक लोक आहेत, कंटेंट क्रिएटर्स आहेत, ज्यांना बिग-बॉसच्या घरात जायचं आहे. या शोचं नाव इतकं मोठं आहे. या शोमध्ये जाण्यासाठी लोक कोणत्याही पातळीवर जातात. जेव्हा तुम्हाला या शोमध्ये जायची संधी मिळते तेव्हा, संपूर्ण महाराष्ट्र तुम्हाला बघत असतो. तुम्हाला त्या संधीचं सोनं करायचं असतं. ते सोडून तुम्ही आतमध्ये माती खाता आणि बाहेर येता. ठिक आहे, माती खाता तर खाता, पण ज्या शोने तुम्हाला ओळख दिली, त्या शोने तुम्हाला महाराष्ट्रासमोर आणलं, त्या शोला नावं तरी ठेऊ नका. बिग बॉस बायस्ट आहे. रितेश देशमुख सरांच्या बाबतीत तर प्लिज ...कोणी काही बोलायचंच नाही वाईट. तो अत्यंच चांगला व्यक्ती आहे.मी बोलतेय रुचिताबद्दल. कोण आहेस तू? कोण होतीस तू... तुला बिग बॉसच्या निमर्त्यांनी एक संधी दिली. तू स्वत:ला सिद्ध करू दाखव. पण नाही..मान्य आहे बिग बॉसच्या घरात चुका होतात. माझ्याकडून झाल्या होत्या. मग मी तर तक्रारींची यादीच करायला पाहिजे.माझ्यासाठी बिग बॉसहा शो, देवासारखा आहे. मी आधीही मालिका केल्या होत्या, पण बिग बॉसमुळे मला ओळख मिळाली. आज मी हिंदी रिॲलिटी शो करून आले, तो फक्त बिग बॉस मराठीमुळेच. त्यामुळे या जे स्पर्धक बिग बॉसवर टीका करतायत, हे मी खपवून घेणार नाही, रितेश सरांच्या विरोधाबद्दल बोलाल तर नाहीच नाही... असं जान्हवीनं म्हटलं आहे.

# मुलींनी एचपीव्ही लसीकरणाचा लाभ घ्यावा- मुख्य कार्यकारी अधिकारी

जनसंचलन/बुलढाणा

महिलांमध्ये आढळणारा गर्भाशय मुखाचा कर्करोग ( ) हा गंभीर आजार असून त्यापासून संरक्षण मिळविण्यासाठी एचपीव्ही () लस अत्यंत सुरक्षित व प्रभावी असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत बुलढाणा जिल्ह्यात ८ मार्च २०२६ पासून एचपीव्ही लसीकरण मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. या मोहिमेत सर्व पालकांनी पुढाकार घेऊन आपल्या मुलींना एचपीव्ही लस देऊन त्यांचे आरोग्य सुरक्षित करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले आहे. या मोहिमेअंतर्गत १४ ते १५ वर्ष वयोगटातील सर्व मुलींना एचपीव्ही लस देण्यात येणार आहे. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळविण्यासाठी ही लस अत्यंत उपयुक्त ठरत असल्याने पालकांनी कोणतीही भीती न बाळगता आपल्या मुलींना ही लस द्यावी, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने गावपातळीवर शाळा, अंगणवाडी व शासकीय आरोग्य संस्थांमार्फत जनजागृती करण्यात येत असून लसीकरण मोहीम यशस्वी करण्यासाठी आरोग्य कर्मचारी, आशा व अंगणवाडी सेविका सक्रियपणे कार्यरत आहेत. पालकांनी आपल्या मुलींना जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेत किंवा शाळेमध्ये आयोजित लसीकरण सत्रात नेऊन एचपीव्ही लस द्यावी व त्यांच्या आरोग्याचे भवितव्य सुरक्षित करावे,



असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. तसेच सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या अफवा किंवा नकारात्मक व्हिडिओंना बळी न पडता शासनाच्या आरोग्य विभागावर विश्वास ठेवून पात्र मुलींनी एचपीव्ही लसीकरण करून घ्यावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# यशवंतराव चव्हाण यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

जनसंचलन/बुलढाणा

देशाचे माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात



अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, सुरेश थोरात, अजिक्य गोडके, समाधान गायकवाड, तहसिलदार वृशाली केसकर यांच्यासह उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केल

# ऑटो रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी आनंद दिघे कल्याणकारी मंडळाची सदस्य नोंदणी सुरू

जनसंचलन/बुलढाणा

संदर्भीय शासन आदेशान्वये धर्मवीर आनंद दिघेसाहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मिटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाअंतर्गत राज्यातील ऑटो रिक्षा व मिटर टॅक्सी चालकांसाठी सदस्य नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक चालकांनी मंडळाच्या संकेतस्थळावर ://.// या लिंकवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी केले आहे. या मंडळामार्फत ऑटो रिक्षा व टॅक्सी चालकांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. त्यामध्ये जीवन विमा व अपंगत्व विमा योजना, आरोग्य विषयक लाभ, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास अर्थसहाय्य योजना, चालकांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, ६५ वर्षांवरील चालकांसाठी सन्मान निधी योजना तसेच कामगार कौशल्य विकास योजना आदींचा समावेश आहे. सदस्यत्वासाठी अर्जदाराकडे ऑटो रिक्षा किंवा टॅक्सी बॅज, वैध वाहन परवाना (लायसन्स) आणि परवाना (परमिट) असणे आवश्यक आहे. तसेच अर्ज करताना नोंदणी शुल्क व ओळखपत्र शुल्क मिळून ५०० रुपये आणि वार्षिक सभासद शुल्क ३०० रुपये ऑनलाईन पद्धतीने भरणे बंधनकारक आहे. राज्यातील पात्र ऑटो रिक्षा व मिटर टॅक्सी चालकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी लवकरात लवकर ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी केले आहे.

# महिला गटांसाठी कृषि अवजारे बँक; ५ एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून शेतकऱ्यांना यंत्रसामग्री सुलभ दरात उपलब्ध व्हावी, या उद्देशाने कृषि विभागामार्फत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (पोकरा) टप्पा-२ अंतर्गत गावस्तरावर कृषि अवजारे बँक हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत नोंदणीकृत महिला शेतकरी गटांना कृषि यंत्रसामग्री खरेदीसाठी अनुदान देण्यात येणार आहे. इच्छुक गटांनी दि. ५ एप्रिल २०२६ पर्यंत महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना रास्त दरात कृषि यंत्रसामग्री उपलब्ध व्हावी यासाठी एक गाव एक अवजारे बँक ही संकल्पना राबविण्यात येत आहे. प्रत्येक तालुक्यासाठी विशिष्ट लक्षांक निश्चित करण्यात आला असून पोकरा अंतर्गत निवड झालेल्या गावांतील महिला गटांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजनेसाठी उमेद पुरस्कृत महिला बचत गट, माविम पुरस्कृत महिला बचत गट तसेच महिला गाव संघ हे गट पात्र आहेत. अवजारे बँकेत बीबीएफ यंत्र, बेडमेकर, बियाणे टोकण यंत्र, भात पेरणी व कापणी यंत्रे, ट्रॅक्टर व ट्रेलर, कम्बाइन हार्वेस्टर व मळणी यंत्र, ड्रोन आधारित फवारणी यंत्र, कांदा लावणी व काढणी यंत्र इत्यादी आधुनिक कृषि यंत्रसामग्रीचा समावेश राहणार आहे. एका गावातून एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास लाभार्थी गटाची निवड ऑनलाईन संगणकीय सोडत पद्धतीने करण्यात येईल. निवड झालेल्या गटांनी ग्राम कृषि विकास समितीचे शिफारसपत्र पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी संबंधित सहाय्यक कृषि अधिकारी किंवा तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.


# ऑटो रिक्षा व टॅक्सी परवान्यांच्या खुले धोरणास स्थगिती; इरादापत्र देणे थांबविले

जनसंचलन/बुलढाणा

राज्यातील विविध संघटनांकडून ऑटो रिक्षा व टॅक्सी परवान्यांचे खुले धोरण बंद करण्याबाबत शासनाकडे विनंत्या प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर दि. ९ मार्च २०२६ रोजी परिवहन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या



बैठकीत ऑटो रिक्षा व टॅक्सी परवान्यांच्या खुले धोरणास तात्पुरती स्थगिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयानुसार ऑटो रिक्षा व टॅक्सी परवान्यांसाठी इरादापत्र ( ) देण्याची प्रक्रिया सध्या स्थगित करण्यात आली असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बुलढाणा यांनी दिली आहे. दरम्यान, शासनाकडून पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत ऑटो रिक्षा व टॅक्सी परवान्यांसंदर्भातील खुले धोरण राबविण्यात येणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच या संदर्भातील पुढील सूचना मिळाल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.



# मोबाईल हॅक करून विवाहितेला विवस्त्र होण्यास भाग पाडले; बुलढाण्यात सायबर विकृतीचा धक्कादायक प्रकार!

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यात सायबर गुन्ह्याचा अत्यंत संतापजनक आणि अंगावर शहारे आणणारा प्रकार उघडकीस आला आहे. एका विवाहित महिलेचा मोबाईल हॅक करून तिच्या खासगी आयुष्यात घुसखोरी करत तिला ब्लॅकमेल करून विवस्त्र होण्यास भाग पाडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी सोनाळा पोलिसांनी ऋषिकेश गिरी (वय २७) या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तो सध्या फरार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने अत्यंत चलाखीने पीडित महिलेचा मोबाईल हॅक करून तिच्या व्हॉट्सअॅप चॅट, गॅलरीतील खासगी फोटो आणि ई-मेल खात्याचा ताबा मिळवला. त्यानंतर या गोपनीय माहितीचा आधार घेत आरोपीने महिलेला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. महिलेचे खासगी फोटो तिच्या पतीसह नातेवाईकांना पाठवून बदनाम करण्याची धमकी देत आरोपीने तिचा मानसिक छळ सुरू केला.



सायबर विकृतीची परिसीमा गाठत आरोपीने महिलेला विवस्त्र होण्यास भाग पाडले. इतकेच नव्हे तर त्या कृत्याचे स्क्रीन रेकॉर्डिंग करून ते तिच्या बहिणीला पाठवल्याची धक्कादायक बाबही समोर आली आहे. या सर्व प्रकारामुळे पीडित महिला प्रचंड मानसिक तणावाखाली गेली होती. ब्लॅकमेल करत आरोपीने पीडितेकडे शारीरिक संबंधांची मागणी देखील केली. तसेच मागणी मान्य न केल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. अखेर सततच्या छळाला कंटाळून पीडित महिलेने सोनाळा पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता () मधील विविध कलमांसह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अंतर्गत कलम ६६() आणि ६७() नुसार गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान आरोपी ऋषिकेश गिरी फरार असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. या घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून सायबर गुन्ह्यांविषयी पुन्हा एकदा गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# पुण्याच्या कंपनीचा मेहकरमध्ये मोठा उत्खनन घोटाळा? २९ कोटींचा दंड; गुन्हा दाखल

जनसंचलन/मेहकर




तालुक्यातील हिवरा खुर्द परिसरात अवैध गौण खनिज उत्खननाचा मोठा घोटाळा उघडकीस आला असून पुण्यातील वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीच्या व्यवस्थापकांविरोधात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महसूल विभागाच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली असून तब्बल २९ कोटींहून अधिक रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या प्रकरणी मेहकरचे तहसीलदार निलेश भिवाजी मडके यांनी दिलेल्या तक्रारीवरून कायम अप. क्र. १२६/२०२६ अन्वये भादंवि कलम ३७९ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ आणि खाण व खनिज अधिनियम १९५७ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, मेहकर तालुक्यातील हिवरा खुर्द (सारंगवाडी) येथील गट क्रमांक ५४९ मध्ये सप्टेंबर २०१३ ते एप्रिल २०१५ या कालावधीत वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीने कोणतीही शासकीय परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर गौण खनिजाचे उत्खनन केले. तसेच विनापरवानगी गिट्टी क्रशर मशीन उभारून चालविल्याचेही आढळून आले आहे. सदर कंपनीने तब्बल १०,६४,३२० घनमीटर म्हणजेच ३,७६,०८४ ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे तपासात समोर आले आहे. या बेकायदेशीर उत्खननामुळे शासनाचे मोठे नुकसान झाले असून महसूल विभागाने फेरचौकशी करून कंपनीवर २२ कोटी ५६ लाख ५० हजार ४०० रुपये तसेच दुसऱ्या आदेशानुसार ६ कोटी ६२ लाख २६ हजार ७२४ रुपये असा एकूण २९ कोटी १८ लाख ७७ हजार १२४ रुपयांचा दंड ठोठावला आहे. मात्र एवढा मोठा दंड आकारूनही कंपनीकडून रक्कम जमा करण्यात आलेली नाही. त्यामुळे शासनाच्या नव्या परिपत्रकानुसार आता थेट फौजदारी कारवाई सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणी कंपनीचे व्यवस्थापक अनिल सुरेशचंद्र मुंदडा आणि हर्षद सुरेश मुंदडा यांच्यासह इतरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि संतोष जाधव करीत आहेत. या कारवाईमुळे मेहकर तालुक्यात खळबळ उडाली आहे.